साक्षीदाराने त्याचे वय १२ वर्ष सांगितल्याने तो सज्ञान नाही. त्याची साक्ष देण्याची क्षमता व साक्ष देण्याची समज आहे का हे पडताळण्यासाठी त्यास खालील प्रश्न विचारण्यात आले—

प्रश्न :— तू देवाला मानतोस का?
उत्तर :— होय.

प्रश्न :— तु काय करतोस?
उत्तर :— मी शाळेमध्ये ६व्या वर्गात शिक्षण घेत आहे.

प्रश्न :— तुला शपथ म्हणजे काय व कशासाठी घेतली जाते हे माहित आहे का?
उत्तर :— होय. खरे बोलण्यासाठी शपथ घेतात.

प्रश्न :— तु आज कशासाठी आला आहे हे तुला माहिती आहे का?
उत्तर :— हो. मी जबाब देण्यासाठी आलो आहे.

साक्षीदाराने विचारलेल्या प्रश्नांना दिलेल्या उत्तरावरून त्याला शपथेचे महत्व समजते व तो साक्ष देण्यास पात्र आहे असे माझे मत झाल्याने त्याला शपथ देवुन त्याची साक्ष घेण्यात येत आहे.

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०३ याची जबानी**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की : —

**माझे नाव : सार्थक सुनिल खुडे**
वय : १२ वर्षे, व्यवसाय : शिक्षण ,
राहणार : धनगरवाडी, देउळगांव सिध्दी, ता.नगर, जि.अहमदनगर.

**शपथेवर सरतपास सरकार पक्षातर्फे सरकारी वकील श्री.जी.ए. भोसले:**

फिर्यादी विनोद हे माझे मामा आहेत. साक्षीदार स्वप्नील हे माझे चुलत मामा आहेत.

२. दि.१६/०३/२०२३ रोजी सायंकाळी ०५.३० वाजताचे सुमारास मी व्यायाम करण्यासाठी सायकलने माझे घरून तालीमीकडे चाललो होतो. सुरज गिरवले हा त्याची चारचाकी बोलेरो घेवुन माझे मागे येत होता. त्याने मला थांबविले. तो गाडीतुन उतरल्यावर मला शिवीगाळ करू लागला व दमदाटी केली. माझे मामा विनोद त्यांचे इस्त्रीचे दुकानातुन तेथे आले. माझे

मामांनी सुरज गिरवलेला काय झाले, का शिवीगाळ करतो असे विचारले. सुरज गिरवलेने त्याचे गाडीतुन लोखंडी पाईप काढला व माझे मामा विनोदच्या पाठीवर व हातावर डाव्या खांद्याला मारला. त्यानंतर सुरज गिरवले तो लोखंडी पाईप तेथेच टाकुन पळुन गेला. त्यानंतर मामाला दवाखान्यामध्ये उपचाराकामी नेले. पोलीसांनी माझेकडे घटनेची चौकशी केली होती.

३. मी ज्या लोखंडी पाईपने मारहाण झाली ते पाहिल्यास ओळखु शकतो. तो लांखडी पाईप गोल आकाराचा अंदाजे तीन ते साडेतीन फुटाचा होता. मला आता आर्टीकल ‘अ’ दखविले. त्यानेच माझे मामाला मारहाण झालेली आहे. सुरज गिरवले हा आजरोजी न्यायालयामध्ये हजर नाही. (आरोपीचा गैरहजेरी माफिचा अर्ज)

४. उलटतपासणीकामी आरोपीच्या वकीलांचा पुकारा करता गैरहजर. मुदतीचा अर्ज नाही. सबब, आरोपीतर्फे उलटतपास नाही या आदेशासह प्रकरण पुढील कार्यवाहीकरिता.

श्रवणोत्तर स्वीकृती,

MAYA ABHIJEET DESHMUKH

Digitally signed by MAYA ABHIJEET DESHMUKH
Date: 2024.04.01 17:10:41 +0530

( माया अ. देशमुख )

**दि.०१/०४/२०२४**

अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.७, अहमदनगर